# पिता, पुत्र आणि आत्मा एक देव आहेत

मुलांना शिकवणायांनी टीपांचसी अभ्यास वाचावा.




**प्रार्थना :**''प्रिय प्रभू, येशू आणि त्याच्या शिष्यांनी, स्वर्गीय पिता हा देव आहे, देव आमच्याकडे येशू म्हणून आला आणि पवित्र आत्मा हा देवाचा आत्मा आहे, दिलेल्या ह्या शिक्षणाचा आदर करण्यास आमचे साहाय्य कर''.

**टीपः** केवळ एकच खरा देव आहे, तो पिता (आमचा निर्माणकर्ता) आहे, तो पुत्र (येशू, आमचा उद्धारक) आहे, आणि आत्मा (आमचा दैवी मदतनीस) आहे, ते एक देव आहेत. येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी योहानाने नमूद केले त्याप्रमाणे, त्यांनी निर्मिती आणि तारणाच्या कार्यामध्ये एकत्रपणे काम केले.

## 1. त्रैक देवाविषयी शिकवण्यासाठी प्रार्थनापूर्वक देवाच्या वचनातून तयारी करा

पाहा प्रे.कृ. 9:1-19 मध्ये ख्रिस्ती लोकांचा द्वेष करणारा पौल येशू हा देव आहे हे कसे शिकला आणि त्याला पवित्र आत्म्याविषयी कशा प्रकारे नव्याने ज्ञान झाले (वचन 17 मध्ये).

पाहा योहान 14:23-26 मध्ये येशूने पिता, पवित्र आत्मा आणि स्वत:विषयी काय सांगितले.

पाहा योहान 5:18-30 मध्ये आम्ही पुत्राचा सन्मान करतो तेव्हा कोणाचा सन्मान करतो आणि असे का.

पिता, पुत्र आणि आत्मा एकत्रितपणे आमच्यामध्ये काय कार्य करतात किंवा आम्हांला काय करण्यास सामर्थ्य देतात ते पुढील प्रत्येक शास्त्रभागात पाहा रोम. 1:1-4; 5:1-5; 7:4-6; 8:1-4; 8:6-11; 8:16-17; 8:26-39; 14:14-18; आणि 15:30-33.

**टीमः** नव्या करारात त्रैक देवाचे वर्णन अनेक प्रकारे केलेले आहे.

पिता व पुत्र आणि आत्मा, निर्माणकर्ता व उद्धारक आणि पवित्र करणारा.

देव व प्रभू आणि पवित्र आत्मा, राजा व मसीहा आणि शिक्षक.

पुढील **महत्वाची सत्ये** लक्षात ठेवा:

- त्रैक्यत्व सार्वकालिक देव आहे आणि ते भौतिक जगातील समय व अवकाशाच्या पलिकडचे आहे.
- देव येशू म्हणून एका समयी (येशूचा जन्म) आणि एका ठिकाणी (बेथलेहम) मनुष्य असा झाला.
- येशू मनुष्य म्हणून जन्मला. त्याने दैवी सामर्थ्य आणि मानवी अशक्तपणा अशा दोन्ही गोष्टी दाखवल्या.
- काही मंडळया शिकवतात की येशूचा दैवी स्वभाव व मानवी स्वभाव ह्यांचा एकाच व्यक्तीत्वामध्ये मिलाप झाला, इतर शिक्षण देतात की येशूचे दैवी व मानवी स्वभाव तसेच वेगवेगळे राहिले. येशू हा देव आणि मानव असे दोन्हीही आहे हे लक्षात घेणे व त्यावर विश्वास ठेवणे महत्वाचे आहे.

**तुम्ही स्वतः परीक्षा करा :** पुढील पैकी कोणत्या संकल्पना येशू आणि नवा करार यांच्या दृष्टीने सत्य आहेत?

- केवळ देवालाच करता येईल असे काम येशू करतो.
- येशू पित्याशी बोलतो आणि पिता येशूशी बोलतो.
- येशू आमच्याकडे पवित्र आत्मा पाठवतो आणि येशू आमच्याकडे आत्मा म्हणून येतो.
- आम्ही येशूचा सन्मान करतो तेव्हा आम्ही देवाचा सन्मान करतो.
- आम्हांला पित्याकडे व पुत्राकडे आणि आत्म्याकडे प्रार्थना विनंती करता येते. *(उत्तर : ह्या सर्व संकल्पना सत्य आहेत)*

## अथानिसिअस आणि अरिअस

चौथ्या शतकात ईजिप्तमधील ईश्वरविद्येत पारंगत अशा दोघांनी येशू कोण होता याविषयी वाद विवाद केला. अरिअसने त्रैक्यत्व नाकारुन देवाच्या ऐक्यावर भर दिला. येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी देवाचे वचन त्याच्यावर उतरले आणि त्याला मसीहा करुन ''देवाचा पुत्र'' असे म्हटले, हे मत त्याने मांडले. त्याच्या ह्या शिक्षणाचा रोमन साम्राज्यात वेगाने प्रसार झाला.

**अथानिसिअसने** शिकवले की देवाचा पुत्र हे जिवंत वचन असून तो अगदी येशूचा जन्म व बाप्तिस्मा होण्याच्या पूर्वीपासून पित्याबरोबर होता आणि एक देव हा सार्वकालिक दृष्टया दोन पिता व पुत्र असा आहे. मग पवित्र आत्माही देव असल्याचे त्याने पाहिले आणि एक देव हा सार्वकालिकदृष्टया तीन पिता, पुत्र व पवित्र आत्मा असा आहे.

इ.स.325 मध्ये संपूर्ण साम्राज्यातील मंडळयांचे पुढारी नायसिया येथे एकत्र जमले आणि त्यांच्यापैकी बहुतेकांनी अरिअसच्या कल्पनांपेक्षा अथानिसिअसचे शिक्षण अधिक पवित्र शास्त्रानुसार असल्याचे मत नोंदवले. म्हणूनच त्यांनी अथानिसिअसच्या त्र्येक्यत्वाच्या सिद्धांताला मान्यता दिली आज, बहुसंख्य ख्रिस्ती लोक त्र्येक्यत्व खरे असल्याचे मानतात. ह्याला नकार देणायांना अरिअस म्हटले जाते.

काही **धर्म** येशूचा देव म्हणून सन्मान करण्यास नकार देतात, येशू हा देवाचा पुत्र होता आणि तो त्याच्या शरीराने मरणातून उठला हे यहोवाचे साक्षी नाकरतात. येशू मरणानंतर देव झाला असे मौरमौन्स मानतात आणि मौरमैन्स देव होतील असे सांगतात येशू कधीच देव नव्हता आणि तो मेला नाही तसेच मरणातून पुन्हा उठला नाही असे इस्लाम शिकवतो. यापैकी कोणीही, आपण पित्याचा आदर करतो (योहान 5:19-30) तसा पुत्राचा, पवित्र शास्त्रात आज्ञापिले आहे त्याप्रमाणे, आदर-सन्मान करीत नाही.

## 2. तुमच्या सहकायांशी चर्चा करुन येणाया आठवडयातील कार्यक्रम ठरवा

तुमच्या मंडळीतील विश्वासणायांना त्रैक्यत्व समजण्यात काही अडचण असेल किंवा खोटया शिक्षकांनी त्यांना गोधाळात पाडले असेल तर त्यांची भेट घेऊन पुढील सत्ये त्यांना स्पष्ट करुन सांगा :

- येशू हा सार्वकालिक देवाचा पुत्र मनुष्य झाला आणि तो सदोदित देव आणि मनुष्य असणार आहे.
- त्रैक्यत्व म्हणजे तीन देव नव्हेत. तर पिता, पुत्र आणि आत्मा एक देव आहे.
- देव एक आहे आणि तो तीन व्यक्तीही आहे. हे अद्‌भुत गुढ, रहस्य असून कोणाही मनुष्याला त्याचे स्पष्टीकरण करता येत नाहीं. आम्ही त्यांच्यात भर घालीत नाही, त्या वेगवेगळया व्यक्ती असल्यातरी एकत्र आहेत.
- येशू हा सार्वकालिक देव मनुष्य झाला तो देव आणि मानव असा दोन्हीही आहे. येशू हा फक्त मनुष्य होता आणि ख्रिस्त हा आत्मा देवाने येशूच्या ठायी राहण्यास पाठवला असे म्हणणे निखालस चुकीचे आहे.
- पिता आणि पुत्र सर्वकाळ संवाद व सहकार्य करतात. पुत्र मनुष्य झाल्यावर तो आणि पिता यांच्यातील संवाद व सहकार्य तसेच पुढे सुरु राहिले. अशा प्रकारे, येशू देव आहे तर त्याला पित्याकडे प्रार्थना विनंती करण्याची गरज नाही, असे म्हणणे चूक आहे.

- 'त्रैक्यत्व' हा शब्द पवित्र शास्त्रात आढळत नाही. पवित्र शास्त्रामध्ये आम्हांला जे आढळते ते म्हणजे पिता, पुत्र व आत्मा ह्यांचे ऐक्य वर्णन करण्यासाठी आम्ही हा शब्द वापरतो. त्रैक्यत्वाचा शोध रोमन कैथॉलिक लोकांनी लावला असे म्हणणे चूक आहे.

  पुढ्यायांना प्रशिक्षण देणाया इतर मंडळयांच्या पाळकांना भेटून ह्या सत्यांचा ऊहापोह करण्यास मदत करा.

**3. तुमच्या सहकायांशी चर्चा करुन पुढील उपासनासभेविषयी योजना आखा. सध्याच्या गरजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.**

- **प्रे.कृ. 9:1-19** मधील वृत्तांत वाचा किंवा सांगा. यात शौल येशू हा देव आहे हे कसे शिकला आणि त्याला पवित्र आत्म्याविषयी कशा प्रकारे नव्याने ज्ञान झाले (वचन 17) हे सांगितले आहे.
- **रोम 1:1-4** वाचून आमचे तारण, आमचे पवित्रीकरण. येशूसाठीच्या आमच्या साक्षी आणि देवासाठी आम्ही करतो त्या सर्व गोष्टी मध्ये त्रैक्यत्व कसे सहभागी असते याविषयी स्पष्टकरण करा.
- तुम्ही भाग 1 मध्ये शिकलेल्या गोष्टी स्पष्ट करुन तेच प्रश्न विचारा.
- मुलांनी तयारी केलेले कार्यक्रम प्रौढांसमोर सादर करण्याची संधी द्या,
- अथानिसिअस आणि अरिअस ह्यांचा वृतांत सांगा.
- येशू हा देव आहे हे विश्वासणायांनी प्रथम कसे ओळखले याबद्दल त्यांना साक्ष देण्यास सांगा.
- प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी मत्तय 3:13-17 वाचा. देव जो पिता, देव जो पुत्र आणि देव जो आत्मा येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी जसे एकत्रित कार्य केले तसेच प्रभुभोजना मध्येही केले हे स्पष्ट करा. पातके झाकण्यासाठी निर्दोष रक्ताचे सिंचन केले पाहिजे असा पित्याने आदेश दिला, पुत्राने आपले रक्त सांडले, आम्ही भाकरी व प्याल्याचे सेवन करतो तेव्हा पवित्र आत्मा आम्हांला येशूचे शरीर व रक्त यामध्ये सहभागी करुन होतो (1 करिंथ. 10:16-17).
- दोन अथवा तीन जणांचे लहान गट करुन प्रार्थना करा, कृती कार्यक्रमाची योजना तयार करा आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.
- **पाठ करा** मत्तय 3:16-17.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net